**नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक ३१/२०१६ मधील निशाण ४६ खालील आदेश**

१. प्रतिवादी यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १४, नियम ५ अन्वये मुद्दे दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांनी या अर्जास नि. ४७ वर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविली आहे.

३. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे वादी यांनी जे खरेदीखत रद्द करुन मागितले आहे, ते खरेदीखत प्रतिवादी नं. १ व २ यांनी प्रतिवादी नं. ६ यांचे नावे करुन दिले आहे. त्यामुळे, मुद्दा क्र. ७ मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती होणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये दिनांक २५/०५/२००४ रोजी झालेल्या करारावरुन दिनांक १४/०९/२०१६ रोजी दाखल केलेला दावा मुदतीत नसल्यामुळे तो रद्द होणेस पात्र आहे, असे कथन केले आहे. परंतु, नि. ४३ वरील मुद्दयामध्ये मुदतीबाबत मुद्दा निश्चित केल्याचे दिसून येत नाही. सबब, अर्जात नमूद केलेप्रमाणे मुदतीबाबत मुद्दा निश्चित होणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करणेत यावा, अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

४. वादी यांचे म्हणण्यातील कथनांप्रमाणे मुद्दा क्र. ७ बाबत सुचविलेल्या दुरुस्तीस वादीची हरकत नाही. परंतु, अर्जातील परिच्छेद क्र. २ मध्ये प्रतिवादी सुचवू पाहत असलेला मुद्दा कायदयाबाबतचा मुद्दा आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये वादीचा दावा मुदतीत नाही, असे मोघम कथन केले आहे. त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण कैफियतीमध्ये दिलेले नाही. सबब, मुदतीबाबतचा मुद्दा याकामी निघण्याजोगा नाही. मुद्दा क्रमांक ८ मध्ये सर्व बाबी समाविष्ट होतात. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

५. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

६. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ सौ.एन.आर.लकेश्री व वादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.धामणस्कर यांचा युक्तिवाद ऐकला.

७. अर्जातील व म्हणण्यातील परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील कारणमिमांसे सहित निष्कर्ष खालील प्रमाणे -

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. प्रतिवादी या अर्जान्वये मागणी करतात त्याप्रमाणे मुद्दे दुरुस्ती होणे आवश्यक आहे काय? | ..........होय. |
| २. आदेश काय ? | .......अर्ज मंजूर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ बाबत -

८. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी त्यांचे दाव्यात केलेल्या कथनांप्रमाणे प्रतिवादी नं. १ व २ यांनी प्रतिवादी नं. ६ यांना दिनांक ०८/०८/२०१६ रोजी करुन दिलेले खरेदीपत्र रजिस्टर नं. १००२/२०१६ बेकायदेशीर व रद्दबातल आहे. प्रतिवादी यांनी हे कथन नाकारले आहे. या कथनांच्या अनुषंगाने नि. ४३ वरील मुद्दे यादीमध्ये अनुक्रमांक ४ वरील मुद्दा निश्चित करणेत आला आहे. परंतु, या खरेदीखताबाबत जी दाद मागितली आहे, त्याबाबतच्या मुद्दा क्रमांक ७ मध्ये शेवटचा शब्द “defendant No. 6” ऐवजी “defendant No. 1” असे चुकीचे टंकलिखीत झाले आहे. त्यामुळे, या मुद्दा क्रमांक ७ मध्ये “defendant No. 1” ऐवजी “defendant No. 6” अशी दुरुस्ती होणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे या अर्जातील परिच्छेद क्रमांक १ मध्ये या दुरुस्तीच्या अनुषंगाने मुद्दा क्रमांक ७ सुचविला आहे. त्यास वादी यांची हरकत नाही. सबब, वर नमूद केलेप्रमाणे मुद्दा नं. ७ दुरुस्त होणे आवश्यक आहे.

९. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनाप्रमाणे त्यांनी त्यांचे कैफियतीमध्ये दिनांक २५/०५/२००४ रोजी झालेल्या करारावरुन दिनांक १४/०९/२०१६ रोजी दाखल केलेला दावा मुदतीत नसल्यामुळे तो रद्द होणेस पात्र आहे, असे कथन केले आहे. परंतु, त्याबाबत मुद्दा निश्चित झालेला नाही. वादी यांनी मुदतीच्या या मुद्दयास हरकत घेतली आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी त्याबाबत कोणतेही स्पष्ट कथन केलेले नाही. त्यामुळे, हा मुद्दा निश्चित करणे आवश्यक नाही.

१०. वादी यांनी त्यांचे दाव्यातील परिच्छेद क्र. ११ मध्ये "दिनांक

०८/०८/२०१६ रोजी प्रतिवादी नं. १ ने विनाधिकार व बेकायदेशीरपणे दावा मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी नं. ६ ला करुन दिलेले आहे. त्यामुळे, प्रतिवादी नं. १ ते ५ हे दिनांक २६/०५/२००४ रोजीच्या दावा मिळकत खरेदी देणेबाबत वादीशी केलेल्या कराराप्रमाणे वादीला दावा मिळकत खरेदी देण्यास इच्छुक नाहीत, याची खात्री वादीला झालेली आहे. त्यामुळे, दाव्यास कारण घडले असून दावा मुदतीत आहे", असे कथन केले आहे. याउलट प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमध्ये कथन केले आहे की, "दिनांक २५/०५/२००४ रोजी झालेल्या करारावरुन दिनांक १४/०९/२०१६ रोजी दाखल केलेला दावा मुदतीत नसल्यामुळे तो रद्द होणेस पात्र आहे." वादी व प्रतिवादी यांनी परस्पर विरोधी कथने केली आहेत.

११. वादीतर्फे विधीज्ञ श्री.धामणस्कर यांनी केलेल्या युक्तिवादाप्रमाणे प्रतिवादी नं. १ यांनी दिनांक ०८/०८/२०१६ रोजी प्रतिवादी नं. ६ यांचे लाभात दावा मिळकतीचे खरेदीखत केल्यामुळे त्यांनी वादी यांचे लाभातील कराराप्रमाणे खरेदीखत करुन देण्याचे नाकारले, हे स्पष्ट होते. त्यामुळे, त्यावेळेपासून मुदत सुरू होत असून दावा मुदतीत आहे. मुदतीचा कायदा, १९६३ चे आर्टिकल ५४ अन्वये खरेदीखत करुन देणेचा दिनांक निश्चित केला असेल तर त्या दिनांकापासून किंवा ज्या दिवशी खरेदीखत करुन देण्याचे नाकारले, हे वादीला समजेल त्या दिवसापासून तीन वर्षाची मुदत सुरू होते. या तरतुदीचा विचार करता प्रतिवादी यांनी वादी यांना दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देणेचा दिनांक निश्चित केला होता किंवा कसे? आणि दिनांक ०८/०८/२०१६ रोजी प्रतिवादी यांनी वादी यांना खरेदीखत करुन देण्याचे नाकारले, याची वादीला खात्री झाली किंवा कसे? या बाबी दाव्याचे चौकशी वेळी गुणदोषावर पडताळणे आवश्यक आहे. त्या करीता वादी व प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १४ नियम १ अन्वये वादी व प्रतिवादी यांनी केलेल्या परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने मुद्दा निश्चित केला जातो. त्यामुळे या क्षणी दावा मुदतीत आहे किंवा कसे, हे गुणदोषावर पडताळणे आवश्यक नाही. या कामी वादी व प्रतिवादी यांनी दाव्याचे मुदतीबाबत परस्पर विरोधी कथने केलेली आहेत. त्यामुळे, वर नमूद तरतूदीचा विचार करता प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जामध्ये मुदतीबाबत जो मुद्दा सुचविला आहे, तो मुद्दा निश्चित करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर

होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u>**

१२. वर नमूद केलेल्या विवेचनावरुन प्रतिवादी यांचा हा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत मी आलो आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी यांचा नि. ४६ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जात सुचविलेला दुरुस्त मुद्दा क्रमांक ७ नि. ४३ वरील मुद्देयादीत निश्चित करणेत येत आहे.

३. प्रतिवादी यांनी त्यांचे अर्जामध्ये सुचविलेला मुदतीबाबतचा मुद्दा नि. ४३ वरील मुद्दे यादीमध्ये नवीन मुद्दा क्रमांक ६ अ म्हणून निश्चित करणेत येत आहे.

४. त्याप्रमाणे नि. ४३ वरील मुद्दे यादीमध्ये दुरुस्ती करणेत यावी.

-

**दिनांक - २६/०९/२०१८.** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण - लांजा.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,लांजा,**
**जि.रत्नागिरी.**